# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

Scanned with OKEN Scanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal

ISSN 2231 - 573X

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,

कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

Scanned with OKEN Scanner

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-२]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे    डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

| | | |
|---|---|---|
| ३३. | छत्रपती शिवाजी महाराजांची इतिहासप्रसिद्ध सुरतेची लूट : एक दृष्टिक्षेप<br>- तेजस शांताराम रेवाळे | ११६ - ११९ |
| ३४. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- अनिता आत्माराम पवार | १२० - १२४ |
| ३५. | छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा आरमारविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. दराडे संभाजी सोपानराव व प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर | १२५ - १२८ |
| ३६. | महात्मा फुलेलिखित छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे व डॉ. ललिता मानसिंग गोपाळ | १२९ - १३५ |
| ३७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- प्रा . प्रदीप इन्सुलकर व प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर | १३६ - १३९ |
| ३८. | शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन. | १४० - १४१ |
| ३९. | शिवविचार – छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा<br>- प्रफुल्लसिंग सुवर्णसिंग राजपूत व प्रा. डॉ. भा.ना. गाडेकर | १४२ - १४७ |
| ४०. | कृष्णराव अर्जुन केळूसकरलिखित क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज चरित्राची मीमांसा - डॉ. सहदेव शरद चव्हाण | १४८ - १५१ |
| ४१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे : व्यक्तित्त्व<br>- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर महादराव गाडे | १५२ - १५४ |
| ४२. | शिवकालीन खान्देशातील उद्योग व व्यापार : एक दृष्टिक्षेप<br>- प्रा. डॉ. ए. जी. सोनवणे | १५५ - १५८ |
| ४३. | शिवकालीन शस्त्रास्त्रे<br>- प्रा. डॉ. रमाकांत अंबादास चौधरी | १५९ - १६२ |
| ४४. | शिवकालीन बखर वाड्मय<br>- डॉ. रश्मी शेट्ये-तुपे | १६३ - १६५ |
| ४५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. दिलीप सावंत | १६६ - १६८ |
| ४६. | शिवकालीन नाणी - एक अभ्यास<br>- प्रा. दिकोंडा रूपाली गोवर्धन | १६९ - १७१ |
| ४७. | हिंदवी स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>- प्रा. डॉ. स्वाती रा. सरोदे | १७२ - १७५ |
| ४८. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित | १७६ - १८२ |




Scanned with OKEN Scanner




# छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा आरमारविषयक दृष्टिकोन


**- डॉ. दराडे संभाजी सोपानराव**
इतिहास विभागप्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर
ई-मेल : sambhajidaradc333@gmail.com

**- प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर**
इतिहास विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर
ई-मेल : dnypadar@rediffmail.com


छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. स्वराज्याची बीजे आई जिजाऊंनी शिवाजी महाराजांमध्ये बालपणीच रुजवली होती. शहाजीराजांनी शिवाजीराजांची नेमणूक वयाच्या बाराव्या वर्षी पुण्याची जहागिरी पाहण्यासाठी केली होती. आई जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जहागिरीचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. जहागीरदारीचा कारभार पाहता-पाहता सह्याद्रीच्या या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन एका नव्या जोमाची अठरापगड मावळ्यांची फौज घेऊन गनिमी कावा युद्धतंत्राच्या साहाय्याने विजापूर आदिलशहाच्या जहागिरीदारीतील गड-किल्ले शिवाजीराजांनी जिंकून घ्यायला सुरुवात केली. एक-एक किल्ला म्हणता म्हणता शिवाजी महाराजांच्या ताब्यात तोरणा, राजगड, रोहिडा, कोंढाणा, पुरंदर असे अनेक किल्ले आले. इ. स. १६५५-५६ च्या दरम्यान शिवाजीराजांच्या ताब्यात रायगड आला आणि शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची हद्द ही समुद्रतटापर्यंत जाऊन पोहोचली. त्यामुळे साहजिकच शिवाजी महाराजांचा सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीच, डच व फ्रेंच या सागरी सत्तांशी संघर्ष झाला. या सागरी सत्तांचे आरमार हे एक भक्कम अशा स्वरूपाचे होते. त्यामुळे ते आसपासच्या प्रदेशावर हल्ला करून लुटालूट करीत असत. दिवसाढवळ्या बायका पळवून नेत असत. हिंदू धर्म बाटवीत असत, तसेच समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशात जनतेवर अत्याचार करीत. त्यामुळे शिवाजी महाराजांना आरमाराची गरज भासू लागली. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व गाजविण्यासाठी आणि महत्त्वाच्या ठिकाणाची बंदरे, किल्ले काबीज करण्यासाठी परकीय सत्तांमध्ये चढाओढ लागली होती. म्हणून अशा पार्श्वभूमीवर किनारपट्टीवरील बंदरे ताब्यात ठेवून आपला व्यापारी माल युरोपमध्ये पाठविण्यासाठी आरमाराची इ. स. १६५९ मध्ये स्थापना केली.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

- छत्रपती शिवाजीराजांचा आरमार स्थापनेमागचा उद्देश जाणून घेणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांचा आरमारविषयक दृष्टिकोन जाणून घेणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची माहिती घेणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारातील विविध जहाजांची माहिती घेणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचा इतर आसपासच्या प्रदेशावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**आरमाराची गरज का भासली ? -**

भारतात इ. स. १४९८ वास्को-द-गामा हा पोर्तुगीज दाखल झाला होता. त्यानंतर डच, इंग्रज, फ्रेंच दाखल झाले. त्यांचे व्यापारी वर्चस्व हे प्रामुख्याने सागरी तटाच्या आसपासच्या भागातच असल्याचे दिसून येते. त्यातच सिद्दीची ही एक सागरी भागातील सत्ता होती. या सिद्दीची प्रमुख आरमारी ठाणे जंजिरा या किल्ल्यावर (बेटावर) होती. त्यामुळे दंड-राजापुरी व त्याच्या आसपासचा जो काही प्रदेश होता तो साहजिकच सिद्दीच्या ताब्यात येत होता.

सिद्दी समुद्रामध्ये लुटमारी करीत असत. शिवाय राजगड किल्ला ताब्यात आल्याने शिवाजी महाराजांच्या ताब्यात

तळकोकणचा बराचसा भाग आला होता. या कोकणाच्या किनाऱ्यालगतच्या या भागांमध्ये सिद्दी हल्ला चढवीत असत व या भागात जाळपोळ, लुटालूट व बाटवा-बाटवी करीत असत. तेवढ्यावरच न थांबता या भागातील बायका पळवून नेट असत व त्यांच्या अब्रूशी खेळत. शिवाजी महाराजांच्या दृष्टीने स्त्री ही आईसमान होती. इ. स. १६५७ च्या आसपास महाराजांनी कल्याण-भिवंडी जिंकून घेतले व राजपूरपर्यंतचा प्रदेश ताब्यात आल्याने सिद्दीशी संघर्ष झाला. त्याविषयी कृष्णाजी अनंत सभासद बखरीमध्ये लिहितो की, "त्याचे लोकांनी राजियाचे देशास उपद्रव मांडीला पुढे राजियास राजापुरीचे सिद्दी हायत जैसा उंदीर तैसा शत्रू यास कैसे जेर करावे म्हणून तजवीज पडली."

जंजिऱ्याच्या सिद्दीचे महाराजांच्या या प्रदेशावरील हल्ल्याचा, जाळपोळीच्या व स्त्रियांच्या अब्रूच्या संरक्षणासाठी सिद्दी याचा बंदोबस्त करणे गरजेचे होते आणि तो बंदोबस्त करणे आरमाराशिवाय शक्य नव्हता, म्हणून शिवाजी महाराजांनी वसईच्या भागांमध्ये आरमार उभारण्यास सुरुवात केली. हे आरमार जरी सिद्दी याचा बंदोबस्त करण्यासाठी असले तरी पोर्तुगीज, इंग्रज, डच यांच्यावर नजर ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग होणार होता. व्यापारासाठी आलेल्या या परकीयांनी त्यांच्या व्यापारी वखारीच्या आसपासच्या प्रदेशातील राजकारणात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.

**आरमार उभारणी सुरुवात -**

छत्रपती शिवाजी महाराजांना आरमार उभारण्याची गरज भासली व त्यांनी आरमार उभारण्याचा निर्णय घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या हाताने कल्याणच्या खाडीमध्ये इ. स. १६५७ मध्ये आरमार बांधणीला सुरुवात केली. "आदिलशहाचा बंडखोर सरदार शहाजी याच्या एका मुलाने वसई व चौलकडील प्रदेश काबिज केला असून तो बलिष्ठ झाला आहे. त्याने काही लढाऊ गलबते भिवंडी, कल्याण व पनवेल या वसई तालुक्याचे बंदरांमध्ये बांधिली आहे. त्यामुळे आम्हास सावध राहणे भाग झाले आहे. हे गलबते समुद्रात फिरकू न द्यावी म्हणून (पोर्तुगीज) कॅप्टनला आम्ही आज्ञा केली आहे की, त्याने सदर गलबते बंदरातून बाहेर येऊ देऊ नयेत."

आरमाराच्या निर्मितीमुळे परकीय सत्तांना शह बसून सार्वभौमत्व सिद्ध होणारे होते. आरमार उभारणीच्या पाठीमागे राजकीय कारण महत्वाचे दिसून येते. आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्य म्हणतात 'आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यागत आहे.'

यावरून शिवाजी महाराजांच्या सामर्थ्याची कल्पना येथे आपणास पाहावयास मिळते. शिवाजी महाराजांनी भिवंडी, कल्याण व पनवेल हे वसई तालुक्यातील बंदर येथे त्यांनी काही लढाऊ गलबते निर्माण केल्याचे दिसून येते. त्याकाळच्या वसईच्या भागातील जहाजबांधणीत पारंगत असणारे तज्ज्ञ कारागीर रूय लैताव व्हियेगस व त्यांचा मुलगा फेर्नाव व्हियेगस लैताव यांच्या नेतृत्वाखाली महाराजांनी आपल्या आरमारातील पहिले वीस लढाऊ गलबते बांधण्यास सुरुवात केली. या दोन जहाजबांधणीतज्ज्ञ कारागिरांच्या मार्गदर्शनाखाली जवळजवळ तीनशेपेक्षाही जास्त कारागीर काम करीत होते. त्यातून आरमाराच्या उभारणीचे कामकाज जोरात चालू होते. इ. स. १६५७ ते १६५९ एवढ्या काळात महाराजांच्या आरमारातील वीस जहाजे तयार झाली. यांचा धसका मात्र जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर इतर परकीय सत्तांनीदेखील घेतलेला पाहायला मिळतो. म्हणून जहाजबांधणीच्या कामात काम करणारे सर्व पोर्तुगीज कारागीर कामगार काम सोडून वसई-मुंबईला पळून गेले.

**मराठा आरमारातील जहाजे -**

शिवाजी महाराजांचे आरमार निर्माण झाले. त्यामध्ये लढाऊ जहाजेच होती असे नाही. महाराजांना व्यापाराचे महत्त्व माहिती होते, म्हणूनच शिवाजीराजांनी काही व्यापारी जहाजेदेखील बांधलेली पाहावयास मिळतात. शिवाजीराजांच्या जहाजांचे प्रकार आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील -

- **गुराबा :** गुराबा हे तसे इतर जहाजांच्या तुलनेने मोठे जहाज होते. त्यामुळे त्याचा उपयोग साधनसामग्री व दारूगोळा ठेवण्यासाठी केला जात असे. यावर १००-१५० पर्यंतच सैनिक असत.
- **गलबत :** गलबत हे आकाराने गुराबापेक्षा लहान असे. त्यावर गुराबापेक्षा साधनसामग्री व दारूगोळा कमी असे. मात्र, त्याची वेगाने हालचाल करणे शक्य होत असे.
- **माचवा :** माचवा एक लहान असे जहाज होते की,



Scanned with OKEN Scanner

ज्यावरती साधारणतः २५ ते ४० च्या दरम्यान सैनिक असत. लहान असल्याकारणाने वेगाने हालचाल करणे शक्य होत असे.

- **शिबाड :** शिबाड हे एक मालवाहू जहाज होते. याचा वापर व्यापारासाठी केला जात असे. हे जहाज वल्हवता येत नसून केवळ वाऱ्याच्या आधारेच वाऱ्याच्या एकाच दिशेने चालत असे. गरज पडल्यास यावरती तोफा बसवून युद्धासाठीही याचा वापर केला जात असे.
- **तिरकती :** तिरकती हे तीन डोलकाठ्यांचे जहाज होते.
- **पगार :** पगार ही एक छोटीशी होडी होती. ती वल्हवून नेली जात असे.

याचबरोबर तारू, तरांडे अशीही जहाजे शिवाजी महाराजांच्या आरमारात असल्याची दिसून येतात. ही जहाजे तयार करीत असताना उत्तम अशा प्रकारच्या सागवानी लाकडाचा उपयोग केला जाई. हे लाकूड प्रामुख्याने कोकणात मिळत. शिवाजीराजांच्या आरमारी व्यवस्थेत २०० जहाजांचा एक सुभा केला जात असे. मायनाक, भंडारी व दौलतखान हे आरामाराचे प्रमुख अधिकारी होते. तसेच आरमारात कोळी, भंडारी, भोई, खारवी, गाबीत, पालदी-मुसलमान यांचा समावेश असे. "आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते. त्या आपल्या राज्यात अरण्यामध्ये सागवानादी वृक्ष आहेत, त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुशार लिवुन हुजुराचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलकी हुन खरेदी करून आणवीत जावे."

आरमारासाठी लागणारे सागवानी लाकूड हे स्वराज्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. ते स्वराज्याचे जंगलामधून तोडून आणावे. त्यासाठी त्या भागातील वतनदाराची परवानगी घ्यावी. मगच झाडे तोडावीत. स्वराज्याच्या कामासाठी लागणाऱ्या लाकडासाठी झाडे तोडताना परवानगी घ्यावी. यावरून महाराजांना निसर्गाविषयी आपुलकी असल्याचे दिसून येते. शिवाय यापेक्षा अधिक लाकूड लागत असल्यास ते दुसऱ्या मुलखातून विकत आणण्याची आज्ञा त्यावेळी महाराजांनी दिली होती. शिवाय स्वराज्यातील रयतेच्या झाडांची महाराजांना खूप काळजी होती.

"स्वराज्यातील आंबे, फणस आदीकरून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची; परंतु त्यास हात लावू न द्यावा. काय म्हणोन की ही झाडे वर्षा दोन वर्षांनी हे ऐसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरासारखी बहुत काळ जतन करून वाढविली."

कोकणचा विचार केल्यास जशी सागवान लाकडाचे जंगल तसेच आंबा, फणस, नारळ, काजू यांसारख्या झाडांच्या बागाच-बागा पाहावयास मिळतात. त्यातील आंबा, फणस या झाडाचे लाकूड पाण्यात लवकर खराब न होणारे असल्याने ते आरमाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. स्वराज्यासाठी आरमार जरी उभारीत असले तरी रयतेची ही झाडे होती.

शिवाजी महाराजांना त्या झाडाची, रयतेची काळजी विशेष होती, म्हणून महाराजांनी सक्त ताकीदच अधिकाऱ्यांना दिली होती की, रयतेने स्वतःच्या लहान मुला-बाळाप्रमाणे या झाडाचे जतन केले आहे. ती एक-दोन वर्षांत मोठी होत नाहीत. याची झाडे तोडून त्यांना दुःख देऊ नये. यावरून महाराजांना प्रजेबद्दल काळजी असल्याचे दिसून येते. जर एखादे झाड खूपच जुने झाले असेल व त्याच्या मालकाला काही उपयोग नसेल, तर त्याच्या मालकाच्या परवानगीने त्या झाडाची योग्य ती किंमत देऊन ते तोडून घ्यावे, अशी आज्ञा महाराजांनी केली होती.

**निष्कर्ष -**

इ. स. १६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यांनी स्वराज्य निर्माण केले; परंतु ते सुरुवातीला सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात पसरलेले होते. महाराजांनी कोकणात प्रवेश केला आणि त्यांचा संबंध आला तो सिद्दी, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज यासारख्या परकीय सत्तांशी. या परकीय सत्ता केवळ व्यापारासाठी भारतात आल्या होत्या आणि प्रत्यक्षात त्यांनी या ठिकाणच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करून लोकांना धर्मांतरित करण्यास, लोकांचा छळ करण्यास सुरुवात केली. त्यांचा बंदोबस्त करायचे ठरले तरी तो करता येत नव्हता. सिद्दीसारखा गनीम जंजिऱ्याचा आश्रय घ्यायचा. परिणामी, महाराजांनी या परकीय सत्तांचा बंदोबस्त करण्यासाठी आरमार उभारले. याच आरमाराच्या जोरावर त्यांनी सिद्दीला धडा शिकवला.

इंग्रजांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे त्यांना धडा



Scanned with OKEN Scanner

शिकवण्यासाठी खांदेरीवर लढाई केली. त्यात इंग्रज अधिकारी मारले गेले. इंग्रजाप्रमाणेच पोर्तुगिजांनादेखील धडा शिकविण्यासाठी महाराजांनी इ. स. १६६५ मध्ये ८५ तारावांचा ताफा घेऊन बेदनूरवर आक्रमण केले होते. त्यावेळी अमाप संपत्ती मिळवली होती. एकंदरीत महाराजांचा आरमाराविषयीचा दृष्टिकोन व्यापकच होता. भविष्यातील आक्रमणाचे, संरक्षणाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी आरमाराची निर्मिती केली होती. स्वतंत्र, बलाढ्य आरमार निर्माण केल्याशिवाय स्वराज्याला पूर्णत्व येणार नाही याची जाणीव शिवाजी महाराजांना होती. जहाजे बनवण्यासाठी लाकूड जनतेकडून विकत घ्यावे, त्यांना त्रास देऊ नये. यावरून शिवाजी महाराज जनतेचा किती विचार करीत असत, हे दिसून येते.

आजच्या संरक्षण यंत्रणेचा विचार केल्यास पायदळ, हवाईदळ एवढेच महत्त्व नौदलालादेखील असल्याचे दिसून येते. आज नौदल व्यापारात महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणून आरमार स्थापनेचा महाराजांचा निर्णय निश्चितच भविष्यात भारताच्या फायद्याचा होता.

**संदर्भ ग्रंथ -**


१) अ. रा. कुलकर्णी, अनुवाद - रामचंद्रपंत अमात्य, 'आज्ञापत्र', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७

२) अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे, 'मराठ्यांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४

३) स्टुअर्ट गॉर्डन, अनुवाद अ. रा. कुलकर्णी, 'द मराठाज', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६

४) गजानन भास्कर मेहंदळे, 'श्री राजा शिवछत्रपती', रावत ब्रदर्स,पुणे प्रथम आवृत्ती १९९६

५) सेतू माधवराव पगडी, अनुवाद - कल्पना वांद्रेकर, 'छत्रपती शिवाजी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१९

६) गोविंद पानसरे, 'शिवाजी कोण होता', लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९८८

७) रामलिंग कुंभार, 'मराठ्यांचे आरमार', प्रफुल्लता प्रकाशन, २०१२

८) 'मराठा आरमार : एक अनोखे पर्व', सचिन पेंडसे, मर्वेन टेक्नॉलॉजिज्, २०१७

९) लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई


◆◆◆◆◆



MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।ध्रु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

**- महात्मा जोतिराव फुले**



Scanned with OKEN Scanner